सप्रेम नमस्कार, विनंती, विशेष.

पुढील अधिवेशनाच्या पताका फडकू लागल्या. आपल्याला तयारीला लागायला हवं. महाराष्ट्रमंडळ, शिकागो यजमान आहेत. कार्यस्थळ निश्चित झालंय्. मदतनिधी गोळा करायलाही सुरूवात झालीय्.
अधिवेशनानिमित्त स्मरणिका काढण्याचा विचारही पक्का केलाय्. या साऱ्या तयारीला तुम्हा सर्वांचा हातभार अपेक्षित आहे. आपण साऱ्यानी मिळून हे पंधरावे संमेलन यशस्वी करू या, त्याचा आनंद वाटून घेऊया.

स्मरणिका–‘संगम’– साठी तुमच्याकडून तुमच्याबद्दल तुम्ही लिहिलेले लेख मागवित आहोत.
‘आम्ही अमेरिकन मराठी ‘या शीर्षकाखाली तुम्ही ‘आम्ही शिकागोचे मराठी‘, ‘ मिशिगनचे मराठी‘ वगैरे तुमच्या भागातील मराठी लोकानी त्यांचे मराठीपण कसे जपलंय् याबद्दल सुमारे ७०० शब्दात लिहिलेले लेख पाठवावेत . सामुदायिकपणे लिहिलेत तरी चालतील. मराठी न जपणाऱ्या लोकांनी देखील त्यांची बाजू सांगावी. प्रत्येक मंडळाकडून एका लेखाला प्रसिध्दी नक्की देण्यात येईल. एकापेक्षा अधिक लेख प्रसिध्द करणे केवळ खर्चवेचावर अवलंबून आहे .

दुसरी अपेक्षा आहे ती आर्थिक मदतीची. प्रत्येक मंडळाने निधी गोळा करावा. मग तो जाहिरातीद्धारा असो की देणगीदाखल असो. जितका निधी जास्त गोळा होईल, तितके लेख प्रसिध्द करणे अधिक शक्य होईल.
कृपया या दोन्ही गोष्टीवर कृतीशील विचार करावा.

तुमचे सहकार्य डिसेंबर १०, २०१० पर्यंत आमच्यापर्यंत पोचेल अशी आशा आहे.

संयोजक, अधिवेशन २०११
महाराष्ट्रमंडळ, शिकागो.